ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २०९ वा ❑ भारतीय सौर दिनांक १७ आश्विन शके १९४८, शुक्रवार दि.०९ ऑक्टोबर २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

दुष्काळग्रस्त विद्यापीठाची फी माफी योजना; मात्र जाचक अटींच्या गर्तेत विद्यार्थी

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

राज्यातील २६५ दुष्काळग्रस्त तालुक्यांमधील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय शासनाने व विद्यापीठांनी घेतला असला, तरी या सवलतीचा लाभ घेताना विद्यार्थ्यांना अनेक जाचक अटी आणि प्रशासकीय त्रुटींचा सामना करावा लागत आहे.

राज्यात दुष्काळजन्य परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने आणि विविध विद्यापीठांनी (उदा. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) हिवाळी परीक्षा शुल्क माफीची घोषणा केली आहे. मात्र, ही शुल्कमाफी मिळवण्यासाठी प्रशासनाने लादलेल्या जाचक अटी आणि तांत्रिक त्रुटींमुळे विद्यार्थी सद्या चक्रव्युहात अडकले आहेत.

शासनाच्या या निर्णयाची अंमलबजावणी कागदावर झाली असली, तरी प्रत्यक्ष महाविद्यालयात अर्ज करताना विद्यार्थी खालील मुख्य अडचणींच्या चक्रव्युहात अडकले आहेत

विद्यार्थ्यांसमर प्रमुख अडचणी व अटी:

सुरुवातीला फी भरण्याची सक्ती: अनेक महाविद्यालये व विद्यापीठे फॉर्म भरताना विद्यार्थ्यांना आधी पूर्ण फी भरण्यास सांगत आहेत आणि नंतर ती बँक खात्यात रिफंड (परतावा) केली जाईल, असे सांगत आहेत. दुष्काळामुळे आधीच आर्थिक टंचाईत असलेल्या शेतकरी पाल्यांकडे तातडीने भरण्यासाठी पैसे उपलब्ध नसल्याने त्यांची अडचण होत आहे.

उत्पन्नाचा दाखला आणि कागदपत्रांची अट: फी माफीचा लाभ घेण्यासाठी कुटुंबियांचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी असणे अनिवार्य आहे. यासाठी तहसीलदारांचा अधिकृत उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला आणि प्रतिज्ञापत्र वेळेत सादर करावे लागत आहे.

बॅकलॉग (एटीकेटी) परीक्षेसाठी सक्तीची वसुली: नियमित सत्राची फी माफ असली, तरी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ (नांदेड) सारख्या काही ठिकाणी बॅकलॉग किंवा जुन्या विषयांच्या परीक्षांसाठी महाविद्यालये अजूनही शुल्क वसूल करत असल्याचा आरोप विद्यार्थी संघटनांनी केला आहे.

इतर योजनांचा लाभ न घेतल्याचे हमीपत्र: विद्यार्थ्यांनी इतर कोणत्याही शासकीय सवलतीचा किंवा स्कॉलरशिपचा लाभ घेतलेला नसावा, अशी अट घातली गेली आहे.

अटींची टक्केवारी: काही विद्यापीठांनी पूर्व परीक्षेत ठराविक गुणांची टक्केवारी किंवा हजेरीची टक्केवारी बंधनकारक केली आहे, जी दुष्काळात काम करून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्ण करणे कठीण जात आहे.

वेळेची मर्यादा: अर्ज सादर करण्यासाठी अत्यंत कमी वेळ दिला जात असल्याने दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना कागदपत्रे गोळा करण्यात अडचणी येत आहेत.

विद्यार्थी संघटनांची प्रमुख मागणी

विद्यार्थी संघटनांकडून मागणी केली जात आहे की, विद्यार्थ्यांना परताव्याची वाट पाहायला न लावता अर्ज भरतानाच झिरो-रुपे रिसिप्ट (शून्य रुपये पावती) पद्धत लागू करून थेट फी माफी दिली जावी, जेणेकरून कोणत्याही विद्यार्थ्याचे आर्थिक अडचणींमुळे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

शासनाने दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांसाठी टास्क फोर्स स्थापन करण्याचे निर्देश दिले असले, तरी प्रत्यक्ष महाविद्यालय स्तरावर अर्जांची छाननी अत्यंत क्लिष्ट पद्धतीने केली जात आहे. निर्णयाची अंमलबजावणी वेळेत न झाल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना नाईलाजाने पूर्ण फी भरावी लागत आहे.

थोडक्यात,दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने फी माफी योजना सुरू केली असली, तरी त्यातील जाचक अटींमुळे विद्यार्थी अडचणीत आले आहेत. ही योजना दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी आणली गेली होती; मात्र क्लिष्ट नियमांमुळे अनेक गरजू विद्यार्थी या लाभापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे.

'हा मोरया कागदा पल्याडचा' ने केले रसिकांना मंत्रमुग्ध



ज्योतिर्मय 🕮 साहित्य

पुणे – आकाश निरभ्र असो किंवा ढगांनी दाटलेले, मनाच्या आकाशात भावनांचे रंग सतत उमटत असतात. याच भावविश्वाला शब्दरूप देणाऱ्या 'कोऱ्या कागदापल्याड' या काव्य कार्यक्रमाचे आयोजन आज, बुधवारी पुणे येथे भरलेल्या 'पुणे पुस्तक जत्रे' मध्ये न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड येथे करण्यात आले होते.

वाई येथील तनुजा इनामदार, पूजा चौंडे, आदित्य चौंडे, अजित क्षीरसागर या चार कवी, कवयत्रींच्या कलाविष्कारातून 'कोऱ्या कागदापल्याडचा' भावविश्वाचा प्रवास अलवार उलगडला. या कार्यक्रमात विविध विषयांवरील स्वलिखित कवितांचे सादरीकरण करण्यात आले. त्यातून जीवनातील विविध पैलू, अगदी बालपण ते लग्न हा प्रवास अतिशय रंजक पद्धतीने कवितांच्या माध्यमातून रसिकांच्या समीर उलगडला गेला.

कार्यक्रमात कवींच्या स्वलिखित कवितांचे बहारदार सादरीकरण झाले. कवितांना संगीताची साथ लाभल्याने त्या अजूनच श्रवणीय झाल्या. या कार्यक्रमात

तनुजा इनामदार, पूजा चौंडे आदित्य चौंडे आणि अजित क्षीरसागर यांनी आपल्या स्वरचित कविता सादर केल्या. तसेच मुंबई व पंजाब येथील 'अल्फा म्युझिक बँडच्या' संगीत संयोजनामुळे कवितांना सुरेल स्पर्श लाभला. कविता कशी सुचते हे कोणताच कवी सांगू शकत नाही, पण ती सुचल्यावर मात्र किती आनंदी होतं मन हे सांगणारी तनुजा इनामदार यांची 'ती अवचित येऊन उभी ठाकते दारी, तर कधी करावी लागते तिची मनधरणी' या कवितेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यांनतर आपल्या बालपणात बोट धरून घेऊन जाणाऱ्या ओव्या पूजा चौंडे यांनी सादर केल्या. अगदी आजीच्या पदराचा गंध अनुभवता यावा एवढ्या त्या ओव्यांत रसिक मंत्रमुग्ध झाले. आदित्य चौंडे यांच्या 'बे एके बे' या कवितेने तर सर्वांनाच ताल धरायला लावला आणि सगळे उपस्थित श्रोते त्याला साथ देऊ लागले.

शाळेत 'आपला प्रिय असणारा बेंच' आणि त्यावर 'आपल्याला नेऊन बसवणारी श्री' ही अजित क्षीरसागर यांची कविता याचा सुरू झालेला प्रवास त्यांनी अगदी स्वयंपाक घरातील लुटीपुटूच्या भांड्यांच्या आवाजाने सुरू होणाऱ्या शीतयुद्ध पर्यंत आपल्याला घेऊन गेला.


बेंच तिथेच राहतो मित्रा आपण वर्ग सोडुनी जातो असं म्हणत असतानाच शाळेतल्या पहिल्या प्रेमाची आठवण करून देणारी कविता पूजा चौंडे यांनी सादर केली.

'मी रानफुल व्हावे, वाऱ्यासंगे झुलावे ! मैफिलीत रानाच्या मी एक तान व्हावे. 'फुलपाखरू मनाचे उडते इथून तेथे एक चित्त राहणे त्याला कधी न ठावे' अस म्हणत सोळाव्या वर्षाच्या वयातल्या असच एक कुर्ता होता म्हणत आदित्य चौंडे आपल्याला त्या कॉलेजच्या रंगू बेरंगी दुनियेत घेऊन गेले. मुलांच्या मनातील उत्सुकता की ती आपल्या बद्दल काय विचार करते हे सांगणारी 'तुला पाहताना किती मी रमावे,तुझ्या नजरेला किती मी भुलावे, तुझी मूक भाषा तुझे छंद सारे तुझे हास्य आणि तुझे रूप न्यारे,

ही कविता मुलांच्या मनातील उत्सुकता जाणून तनुजा इनामदार यांनी सादर केली. अजित क्षीरसागर यांची 'झुमका', आदित्य चौंडे यांची 'मागणी' आणि पूजा चौंडे यांची 'गोष्ट मात्र छानच हवी' या कवितांची मैफल जमत असतानाच तनुजा इनामदार यांची 'चांदण झुला रसिकाना' अगदी चांदण झुल्यात नेऊन बसवणारी ठरली.

अशा अनेक उत्तमोत्तम कविता आणि 'हा मोरया कागदा पल्याडचा' कार्यक्रम रंगतदार पार पडला. या कार्यक्रमासाठी संयोजक पी. एन. आर. राजन, शिरीष चिटणीस प्रमुख पाहुणे डॉ संदीप श्रोत्री, विजया जोशी, सुनिता राव आणि इतर मान्यवर तसेच रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

***




"हीच अमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे"

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

नमस्कार मंडळी!

"हीच अमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे, माणसाने माणसाशी माणसासम वागणे" या ओळी समीर सावंत यांच्या! त्या आठवण्याचे कारण म्हणजे यंदा २० सप्टेंबरच्या दिवशी अशाच एका कलंदर माणसाची दस्तुरखुद्द घेतलेली भेट. नाव आपल्या परिचयाचे, श्री संजय काशिनाथ व्यापारी! व्यक्तिगत व्यस्ततेमुळे या ग्रेट भेटीचा वृत्तांत जरा उशिराच लिहीत आहे. त्याबद्दल उदारहृदयी वाचकांची क्षमा मागते. झाले असे की मी गणपतीच्या दिवसात मुलाकडे पुण्यनगरीत गेले होते, संजय सर तिथेच होते, त्यांच्याकडे गणपती वास्तव्यास विराजमान होते. १३ सप्टेंबर रोजी झालेल्या त्यांच्या वाढदिवसाचे निमित्त होतेच. त्यांच्या वाढदिवसाच्या बिलेटेड शुभेच्छा देण्यासाठी भेटीची वेळ ठरवून गेले, तो काय आश्चर्य, ते संकुलात त्यांच्या इमारतीच्या खालीच माझी वाट बघत उभे होते. १३ सप्टेंबर रोजी प्रकाशित ज्योतिर्मयच्या प्रथम पानावरील अग्रलेखात त्यांच्या मित्राच्या शब्दातील वर्णन मी समोर उभ्या असलेल्या माणसाशी जुळवून बघत होते. इतकेच काय जवळपास एका तासाहून अधिक काळ झालेल्या भेटीत देखील मी हाच प्रयत्न करीत होते. पण ते कांही केल्या जुळेना! त्यांच्यासारख्या बहुगुणी, कर्तृत्ववान आणि व्यासंगी माणसाच्या वागण्याबोलण्यात याचा लवलेशही नव्हता. फोनवर बऱ्याचदा लेखांच्या निमित्ताने बोलणे होत असे. मात्र ही आमची प्रत्यक्ष पहिलीच भेट होती. या भेटीदरम्यान त्यांच्या वागण्याबोलण्यात मला क्षणभरही त्यांच्यात कुठलाही बडेजाव आढळला नाही आणि आपल्या प्रदीर्घ अनुभवाचे प्रदर्शन तर नाहीच नाही. खरे पाहिले तर मला बऱ्यापैकी दडपण आले होते की, इतक्या अनुभवसंपन्न साहित्यकार प्रकाशकाशी बोलणे म्हणजे माझ्यासाठी एक कठीण परीक्षाच असेल, मात्र माझे नशीब बलवत्तर होते. त्यांच्याशी रोजच्याच विषयांवर सहजसुंदर संवाद साधतांना भेटीचा काळ कसा निघून गेला ते देखील कळले नाही. या अनौपचारिक आणि प्रसन्न भेटीदरम्यान मी त्यांना





माझे पहिले मराठी पुस्तक भेट दिले. त्यांनी भेटीचे औचित्य साधत माझ्याच शिक्षकदिनाविषयीच्या हिंदी लेखाची लॅमिनेटेड मुद्रित प्रत मला भेट दिली. हे बघून त्यांच्या गुणग्राहक वृत्तीचे मला खूप अप्रूप वाटले. मला तिथे गेल्यावर कळले की संजय सरांचा त्या दिवसाचा कार्यक्रम अतिशय व्यस्त होता. पण तरीही मला भेटण्यासाठी त्यांनी वेळ काढला याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. भेटीदरम्यान त्यांच्या लोभस स्वभावाच्या, सुगरण आणि सुविद्य पत्नी अलका यांची देखील भेट झाली, याचा अपार आनंद झाला. त्यांच्या घरी स्वहस्ते केलेल्या पर्यावरणपूरक अशा सजावटीच्या विलोभनीय मखरात विराजमान असलेल्या गणरायाच्या दर्शनाने मन भक्तिभावाने ओतप्रोत भरले. आता पुढील भेटीत मात्र योजनाबद्ध मुलाखतीद्वारे त्यांच्या आजवरच्या यशस्वी वाटचालीविषयी आणि त्यांच्या विविध क्षेत्रातील, खास करून पत्रकारितेच्या अनुभवांविषयी सविस्तर जाणून घ्यायची तीव्र इच्छा आहे.

मला खात्री आहे की गणरायाच्या कृपेने हा सुयोग्य योग लवकरच येईल! त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीकरता माझ्या खूप शुभेच्छा!





जात्यावरच्या ओव्या.....

माय माऊलीची माया
घास लेकराच्या ओठी
गेली पळून इडापिडा
हात फिरता पोटीपाठी ||८८३||

माय माऊलीची माया
देव सांगतो जगा
माझं रुप तुझ्या घरी
माय आहे का बघा ||८८४||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758


मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७८

ज्योतिर्मय साहित्य

या श्लोकात भगवंताच्या गुणांचे वर्णन करताना समर्थ तीन विशेषणे वापरतात. तो महा राज आहे, स्वामी आहे आणि कैवल्यदाता आहे. महाराज म्हणजे महान राजा. राजांचा राजा. रामराज्य होऊन आज हजारो वर्षे लोटली तरी रामराज्याची कल्पना आजही लोकांना भावते. रामराज्य म्हणजे आदर्श राज्य होते. राम हा आदर्श राजा. दुसरी गोष्ट म्हणजे तो या चराचराचा स्वामी आहे. इंग्रजी शब्द वापरायचा तर तो सुप्रीम पॉवर आहे. या विश्वाचा निर्माता, पालनकर्ता आणि संहारकर्ता तोच आहे. तिसरी गोष्ट म्हणजे तो कैवल्यदाता आहे. कैवल्यदाता म्हणजे मुक्ती किंवा मोक्ष देणारा. ज्याने ज्याने रामनाम घेतले, तो तरून गेला. मग तो वाल्या कोळी असेल, भक्त प्रल्हाद असेल, रामनाम घेणारी शबरी असेल किंवा अहिल्या असेल. हनुमंत आणि बिभीषण हे रामाचे भक्त तर चिरंजीव झाले.

थोडक्यात सांगायचे झाले तर श्रीराम म्हणजे कल्पवृक्ष आहेत. कल्पवृक्ष हा इच्छिलेले देणारा असतो. त्याच्या सावलीत बसून आपण काय मागायचे हे आपल्यावर आहे. तो आपल्याला जन्म मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्ती देणारा आहे. कैवल्य प्रदान करणारा आहे. असा हा भगवंत आपल्या पाठीशी असताना आपण देहाची आणि संसाराची व्यर्थ चिंता वाहत असतो. माझे कसे होईल, माझ्या मुलाबाळांचे, नातवंडांचे कसे होईल अशी चिंता आपण







करीत बसतो. तर कोणाला या जगाचे कसे होईल अशा प्रकारची चिंता. अशा अनेक प्रकारच्या चिंतांनी सामान्य माणूस गोंधळून जातो.

समर्थ म्हणतात, मनी मानवा व्यर्थ चिंता वाहते, अकस्मात होणार होऊन जाते. प्रारब्धानुसार जे घडायचे असते, ते घडणारच असते. आपण मात्र व्यर्थ चिंता करीत बसतो. त्यापेक्षा आपण त्याच्यावर विश्वास ठेवून सर्व भार त्याच्यावर सोपवावा. याचा अर्थ मात्र असा नाही की आपल्या वाट्याला आलेले कर्म न करता स्वस्थ बसायचे. अर्जुनाला कर्तव्यप्रवण करण्यासाठीच तर भगवंताने गीता सांगितली ना !तेव्हा त्याच्यावर विश्वास ठेवून आपल्या वाट्याला आलेले निहित कर्म उत्तम प्रकारे करावे. तोच पुरुषार्थ आहे. इतर गोष्टी परमेश्वरावर सोपवाव्यात. तुकाराम महाराज म्हणतात, ''घालू देवासीच भार, देव सुखाचा सागर.''मग देहाच्या आणि प्रपंच्याच्या चिंता आपल्याला सतावणार नाहीत. **(क्रमशः)**







श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

नामाचे प्रेम येण्यासाठी खरी कळकळ पाहिजे

ज्योतिर्मय साहित्य

नामाचे प्रेम का येत नाही, हा प्रश्न बहुतेकजण विचारतात. पण थोडासा विचार केला तर असे लक्षात येईल की, हा प्रश्नच बरोबर नाही. मूल न झालेल्या बाईने, 'मुलाचे प्रेम कसे येईल?' असे विचारण्यासारखाच हा प्रश्न आहे. मूल झाले की प्रेम त्याच्याबरोबरच येत असते. तेव्हा, ' मुलाचे प्रेम कसे येईल ' हा प्रश्न करण्याऐवजी, 'मूल कसे होईल' याचाच विचार करणे बरोबर ठरेल. आपणसुद्धा प्रश्न करायचाच असेल तर ' नामाचे प्रेम कसे येईल ' असा करण्याऐवजी, ' मुखी नाम कसे येईल ' असा प्रश्न करणे बरोबर होईल. मुखी नाम यायला वास्तविक आडकाठी कोणाची आहे ? दुसऱ्या कोणाचीही नसून आपली स्वत:चीच आहे. वास्तविक, एकदा नाम घ्यायचे ठरवून सुरुवात केली की झाले. पण तसे होत नसेल तर, दोष दुसऱ्या कोणाचा नसून आपला स्वत:चाच आहे. म्हणून नाम घेणे हे आपले काम आहे; मग त्याच्या पाठोपाठ येणे हा प्रेमाचा धर्मच आहे. जसे आईच्या बाबतीत, मूल आणि प्रेमाचा पान्हा ही निराळी असूच शकत नाहीत, तसे नाम आणि त्याचे प्रेम ही एकमेकांना सोडून राहूच शकत नाहीत. ह्यावरून एक गोष्ट अशी ठरली की, ' प्रेम का येत नाही ? ', याचे उत्तर आमच्याजवळच आहे, आणि ते म्हणजे, ' नाम घेत नाही म्हणून. ' यावर कोणी असे म्हणेल की, आम्ही नाम घेतोच आहोत, तरीही प्रेम का येत नाही ? हे विचारणे ठीक. पण आता आम्ही जे नाम घेतो म्हणून म्हणतो, त्याचा विचार केला तर काय दिसेल ? पोटी जन्माला आलेल्या मुलाबद्दल जसा कळवळा असतो, तसा नामाबद्दल आपल्या ठिकाणी कळवळा नसतो. सर्व संतांनी किंवा आपल्या गुरूने, नाम घ्यावे असे सांगितल्यामुळे आपण ते घेतो, किंवा दुसरे काही करायला नाही म्हणून घेतो, इतकेच. अर्थात, तसे घेतले तरी आज ना उद्या आपले काम होईलच. पण ' प्रेम का येत नाही ? ', असा प्रश्न विचारण्यापूर्वी, आपण नाम किती आस्थेने घेतो, हा प्रश्न स्वत:ला विचारणे जरूर आहे. एखाद्या बाईला फार दिवसांनी मूल झाले तर त्याच्याबाबतीत तिची जी स्थिती होते ती नामाच्या बाबतीत आपली होणे जरूर आहे. आपल्या देहाची वाढ जशी आपल्याला नकळत होते, तशी आपली पारमार्थिक उन्नतीही आपल्याला नकळत झाली पाहिजे. ती कळली तर सर्व फुकट जाण्याचा संभव असतो. परमार्थात ' मिळविण्यापेक्षा ' मिळविलेले ' टिकविणे ', हेच जास्त कठीण आहे. ज्याला ' मी काही तरी झालो ' असे वाटते तो काहीच झालेला नसतो. अशा माणसाने फारच सांभाळले पाहिजे. नवऱ्याला देव आवडत नाही म्हणून बायकोने नामस्मरण सोडण्याचे कारण नाही. तिने नाम घेतले तर धर्म सोडला असे न होता उलट संसार सुखाचा होईल.







ज्येष्ठमधाचे फायदे

ज्योतिर्मय साहित्य

ज्येष्ठमध ही आयुर्वेदातील अत्यंत महत्त्वाची औषधी वनस्पती मानली जाते. गोडसर चव असलेल्या ज्येष्ठमधाचा उपयोग अनेक वर्षांपासून घसा, पचन आणि श्वसनाशी संबंधित तक्रारी कमी करण्यासाठी केला जात आहे. योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने सेवन केल्यास त्याचे अनेक आरोग्यदायी फायदे मिळू शकतात. मात्र, कोणत्याही औषधी वनस्पतीप्रमाणेच ज्येष्ठमधाचाही वापर मर्यादित प्रमाणात करणे आवश्यक आहे.

ज्येष्ठमध खाल्ल्याने घशाला आराम मिळण्यास मदत होते. घसा खवखवणे, आवाज बसणे किंवा कोरडा खोकला यांसारख्या तक्रारींमध्ये ज्येष्ठमधाची छोटी काडी तोंडात ठेवून चघळल्यास घशाला ओलावा मिळतो आणि त्रास कमी होण्यास मदत होते. त्यामुळे गायक, शिक्षक किंवा सतत बोलण्याचे काम करणारे अनेकजण याचा वापर करतात.

ज्येष्ठमध पचनसंस्थेसाठीही फायदेशीर मानले जाते. अपचन, ॲसिडिटी किंवा पोटात जळजळ होत असल्यास ते पचनसंस्थेच्या आतील भागाला आराम देण्यास मदत करू शकते. त्यामुळे पोटातील अस्वस्थता कमी होण्यास मदत मिळते. श्वसनसंस्थेच्या आरोग्यासाठीही ज्येष्ठमध उपयुक्त ठरते. सर्दी, कफ किंवा घशात चिकट कफ साचल्यास ज्येष्ठमधाचा वापर पारंपरिक पद्धतीने केला जातो. त्यामुळे कफ पातळ होण्यास आणि श्वास घेणे थोडे सोपे होण्यास मदत होऊ शकते.

ज्येष्ठमधामध्ये अँटी ऑक्सिडंट्स आणि दाह कमी करणारे घटक आढळतात. हे घटक शरीरातील पेशींना होणारे नुकसान कमी करण्यास आणि शरीराची नैसर्गिक प्रतिकारशक्ती मजबूत ठेवण्यास मदत करू शकतात. तोंडात वारंवार फोड येत असतील किंवा तोंड कोरडे पडत असेल, तर ज्येष्ठमध काही प्रमाणात आराम देऊ शकते. त्यामुळे जळजळ कमी होण्यास मदत मिळते.


संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

ज्येष्ठमध कसे खावे?

ज्येष्ठमधाची छोटी काडी दिवसातून एक-दोन वेळा हळूहळू चघळू शकता. तसेच ज्येष्ठमधाची पूड कोमट पाण्यात किंवा मधामध्ये मिसळून घेता येते. काहीजण ज्येष्ठमधाचा हर्बल चहाही पितात. कोणत्याही स्वरुपात सेवन करताना प्रमाण मर्यादित ठेवणे महत्त्वाचे आहे. उष्ण पडणार नाही याची काळजी घ्या.

ज्येष्ठमध खाताना ही काळजी घ्या

ज्येष्ठमधाचे जास्त प्रमाणात किंवा दीर्घकाळ सेवन करणे टाळावे. उच्च रक्तदाब, हृदयविकार, मूत्रपिंडाचे आजार असलेल्यांनी तसेच गर्भवती महिलांनी डॉक्टरांचा सल्ला घेतल्याशिवाय ज्येष्ठमधाचे नियमित सेवन करू नये. काही औषधांसोबतही त्याचा परस्पर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे नियमित औषधे सुरू असतील तर वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. योग्य प्रमाणात आणि गरजेनुसार वापर केल्यास ज्येष्ठमध घसा, पचन आणि श्वसनसंस्थेच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरु शकते. मात्र, ते औषधाचा पर्याय नसून पूरक उपाय म्हणूनच वापरणे अधिक योग्य आहे.



''या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे'' गझलभाव मैफिलीने रसिकांची मने जिंकली

ज्योतिर्मय साहित्य

पुणे - मराठीतील उत्तमोत्तम गझला आणि सदाबहार भावगीतांचा समावेश असलेल्या ''गझलभाव'' या मैफिलीत गायक कलावंतांनी आपल्या बहारदार स्वराविष्काराने रसिकांची मने जिंकली. अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्ताने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने बुधवार दि. ७ रोजी सांगवी येथील निळू फुले नाट्यगृहात ही मैफिल झाली. सुप्रसिद्ध गायक अशोक गायकवाड यांनी प्रथमतः आपल्या वादक कलावंतांसह ''दयाघना तुटले चिमणे घरटे'' या गीतांचे सूर छेडत रसिकांना आपलेसे केले. त्यानंतर मराठीतील दर्जेदार गझला आणि भावगीतांचा सिलसिला कायम ठेवत रसिकांना स्वरानंदाची एक वेगळी अनुभूती मिळवून दिली. अशोक गायकवाड यांच्यासोबत स्वाती केसकर या गायिकेने सदर मैफिलीत सहभागी होत उपस्थितांची दाद घेतली. दिड तास चाललेल्या या गीत '' या जन्मावर या




जगण्यावर शतदा प्रेम करावे ''

गझलभाव मैफिलीने रसिकांची मने जिंकली

पुणे दि. ९ : मराठीतील उत्तमोत्तम गझला आणि सदाबहार भावगीतांचा समावेश असलेल्या '' गझलभाव '' या मैफिलीत गायक कलावंतांनी आपल्या बहारदार स्वराविष्काराने रसिकांची मने जिंकली. अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्ताने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने बुधवार दि. ७ रोजी सांगवी येथील निळू फुले नाट्यगृहात ही मैफिल झाली. सुप्रसिद्ध गायक अशोक गायकवाड यांनी प्रथमतः आपल्या वादक कलावंतांसह '' दयाघना तुटले चिमणे घरटे '' या गीतांचे सूर छेडत रसिकांना आपलेसे केले. त्यानंतर मराठीतील दर्जेदार गझला आणि भावगीतांचा सिलसिला कायम ठेवत रसिकांना स्वरानंदाची एक वेगळी अनुभूती मिळवून दिली. अशोक गायकवाड यांच्यासोबत स्वाती केसकर या गायिकेने सदर मैफिलीत सहभागी होत उपस्थितांची दाद घेतली. दिड तास चाललेल्या या गीत - संगीताच्या मैफिलीचे वैशिष्ट्य म्हणजे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याच्या गौरवपर '' रे भीमा तुझ्या कृपेने जगणे तर सोपे झाले '' या गझलेने विशेष रंगत आणली. त्यापाठोपाठ ''परीसारखी दिसायची तू'' , ''का रे दुरावा का रे अबोला'', ''झाले जरी कितीही दुःखास सावरावे'', ''केंव्हा तरी पहाटे उलटून रात गेली'', '' गोमू संगतीत माझ्या तू येशील का'' या काही भावगीत आणि गझलांनी बहार आणली. मंगेश पाडगावकर लिखित आणि यशवंत देव यांनी संगीतबद्ध केलेले ''या जगण्यावर या जन्मावर शतदा प्रेम करावे'' या गीताने मैफिलीची सांगता करण्यात आली. मनोज बावा यांच्या अभ्यासपूर्ण आणि खुसखुशीत निवेदन शैलीने उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या मैफलीत गायक कलावंतांना तबल्यावर अमित कुंटे, ॲक्टोपॅड आणि ढोलकवर विनोद सोनवणे, बासरीवर अझरूद्दीन शेख, साईड रिदमवर नरेंद्र काळे, संवादिनीवर रुपेश मोरे, सिंथवर संतोष खंडागळे आणि समद पठाण यांनी समर्पक साथसंगत केली. मध्यंतरात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे उपायुक्त पंकज पाटील यांच्या हस्ते कलावंतांचा पुष्पगुच्छ आणि भारतीय संविधानाची प्रत देऊन सत्कार करण्यात आला.

मायबापाला दूर सारून संसार मांडणारी आजची मुलं

ज्योतिर्मय साहित्य



जिवंतपणी आईवडिलांना वृद्धाश्रमात पाठवायचे आणि ते कायमचे गेल्यावर त्यांच्या श्राद्धासाठी पंचपक्वान्न करायचे...

पितृपक्ष संपत आले. सर्वांनी पितृपक्ष हा पंधरा-सोळा दिवसांचा कालावधी किंवा हे दिवस पितरांना आठवण करत घालवले. सर्वांनाच आपल्या आजी-आजोबांची, आईवडिलांची खुप आठवण आली तर काहींना मनापासून खुप पश्चातापही झालाच असेल. आता कसं झालंय ना कि प्रत्येकजण मी, मला, माझं याच ओझ्याखाली जगतो आहे. बोलतो आहे तो फक्त पैसा. मग त्या पैशापुढे आपण आपली नाती, आपली माणसं विसरतो आहोत याचा सारासार विसर पडला आहे.

अनंत कळा, यातना, वेदना, त्रास सहन करुन लेकरांना जन्म देणारी आई आणि जीवाचा आटापिटा करत, स्वतःच्या पोटाची भूक उपाशी ठेवत लेकरांच्या सुखा:साठी झटणारा बाप आत्ताच्या मुलांना का ओळखू येत नाही. मायबापाला दूर सारून संसार मांडणारी आजची मुलं अशी कशी वेंधळी झाली आहेत. आईवडील असताना त्यांना स्वतःच्याच घरातून हाकलून देऊन अनोळख्या वृद्धाश्रमात नेऊन ठेवतात.



आईवडील असतात तेव्हा त्यांना एका शब्दाने विचारत नाहीत कि, ''आईबाबा काळजी करू नका. मी आहे ना. तुम्ही दोघं आरामात राहा. तुम्ही येवढं केलंय आमच्यासाठी आता आमची बारी. पहिल्या पगारीतून कधी आईला छान रंगाची सुंदर साडी, बाबांना ड्रेस घेत नाहीत. आईवडील असताना त्यांना कधी जवळ बसून विचारत नाहीत कि तुम्हाला बरं आहे ना. कांही दुःखत, खुपत असेल तर सांगा. आईवडील असताना त्यांची किंमत कुणालाच कळत नाही.

ते असेपर्यंत त्यांच्या आवडी निवडी कधी जपत वा ओळखत नाहीत. आणि ते गेल्यावर त्यांचं श्राद्ध करतात तेव्हा पंचपक्वान्न करुन पतरवाळी पूजतात. याला कांही अर्थ आहे का?. आईवडिलांसोबत राहा, त्यांच्यासोबत आयुष्य भरभरून जगा. ते गेल्यानंतर त्यांच्या नावाचे श्राद्ध करुन कितीही थाट मांडून कांही उपयोग नाही. आईवडिलांना घरात ठेवा वृद्धाश्रमात नको.

नेटबॉल स्पर्धेत बेंडाळे महिला महाविद्यालयाच्या मुलींची बाजी; मुलांमध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय विजयी

ज्योतिर्मय साहित्य

जळगाव (गोकुळसिंग राजपूत) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जळगाव विभागांतर्गत आयोजित आंतरमहाविद्यालयीन नेटबॉल स्पर्धेत मुलींच्या गटात डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले, तर मुलांच्या गटात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाने बाजी मारली. ही स्पर्धा शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव येथे उत्साहात पार पडली.

या स्पर्धेत मुलांच्या गटातील चार आणि मुलींच्या गटातील चार अशा एकूण आठ संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठाच्या सिनेट सदस्य सौ. स्वप्नाली काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. नारखेडे उपस्थित होते.

मुलांच्या गटातील अंतिम सामना शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आणि एम. जे कॉलेज यांच्यात झाला. या अटीतटीच्या सामन्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाने विजय मिळवून विजेतेपद पटकावले. तृतीय क्रमांक के सी आय एम आर कॉलेज जळगाव

मुलींच्या गटातील अंतिम सामन्यात यजमान डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालयाने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयावर मात करत विजेतेपद मिळविले. तृतीय क्रमांकावर केसीएमआर कॉलेज जळगाव

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी निवड समिती सदस्य प्रा. अमर हटकर, डॉ. नीलिमा पाटील, प्रा. इफ्तिकार सय्यद, प्रा. हिमाली बोरोले आणि श्री. तागड यांनी सहकार्य केले. तसेच राष्ट्रीय नेटबॉल खेळाडू श्री. जैन यांची उपस्थिती लाभली. स्पर्धेचे सूत्रसंचालन डॉ. अनिता कोल्हे यांनी केले.

विजयी संघांचे अभिनंदन करत



प्राचार्य डॉ. आर. के. नारखेडे यांनी खेळाडूंना पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना, संघभावना आणि स्पर्धात्मक वृत्तीला प्रोत्साहन मिळाले.

मोफत दांडिया प्रशिक्षणला प्रचंड प्रतिसाद

ज्योतिर्मय साहित्य





छत्रपती संभाजीनगर - दर वर्षी प्रमाणे या ही वर्षी नवरात्र निमित्त कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे आयोजि मोफत दांडिया प्रशिक्षण साठी जवळपास १५० मुली व महिला यांनी लाभ घेतला. तीन दिवसीय दांडिया प्रशिक्षण कुलस्वामिनी कार्यालय, सिडको येथे घेण्यात आले.

शेवटच्या दिवशी प्रतिष्ठान तर्फे एक दिवस मोफत दांडिया पास मुली-महिलांना देण्यात आले. कोरिओग्राफर म्हणून प्रगती लोखंडे व भावना सोनी यांनी दांडिया प्रशिक्षण मधे बेसिक, दो ताली, तीन ताली, दोडिया, वेस्टर्न इत्यादी दांडिया प्रकार शिकवले. या उपक्रमाचे आयोजन सौ अलका व विलास कोरडे यांनी केले.

नवरात्र मधे कुलस्वामिनी प्रतिष्ठान व महाराष्ट्र शासन पर्यटन संचालनालय तर्फे '' कुलस्वामिनी दांडिया '' दुष्काळ निधी उपलब्ध करण्यासाठी महिला-मुली व कपल साठी दांडिया आयोजित करण्यात येत आहे, असे प्रतिष्ठान अध्यक्ष विलास कोरडे यांनी कळवले आहे.

दुष्काळ परिस्थिती मुळे, संपुर्ण निधी प्रतिष्ठान तर्फे शेतकरी बांधवाना शेत बांधावर जाऊन वाटप करण्यात येणार आहे.





विचार ते विजय



लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013

जीवनात 'नाही' म्हणायला शिकणं का गरजेचं?

कधी ते फक्त एवढंच सांगतं–
"आत्ता नाही."
स्वतःच्या आरोग्यासाठी नाही.
स्वतःच्या शांततेसाठी नाही.
अन्यायासाठी नाही.
अयोग्य मागणीसाठी नाही.
आणि स्वतःची स्वप्नं सतत बाजूला सारण्यालाही नाही.
नात्यांमध्येही याची गरज असते.
खरं नातं तेच, जिथे आपल्या "नाही"चा आदर केला जातो. प्रत्येक वेळी होकार मिळाला तरच नातं टिकत असेल, तर ते प्रेमापेक्षा अपेक्षांवर उभं असू शकतं.
आपल्या आयुष्याला मर्यादा आहेत–
वेळ मर्यादित आहे, ऊर्जा मर्यादित आहे, आयुष्य मर्यादित आहे.
म्हणून प्रत्येक गोष्टीला हो म्हणण्यापूर्वी स्वतःला विचारा–
"यासाठी मी काय गमावणार आहे?"
कदाचित तुमचा एक "नाही" तुम्हाला एखादा मोकळा संध्याकाळ देईल.
कदाचित तो तुमच्या मुलासोबतचा एक सुंदर क्षण वाचवेल.
कदाचित तो आई-वडिलांसोबत बसण्यासाठी वेळ देईल.
कदाचित तो तुम्हाला तुमचं अपूर्ण स्वप्न पुन्हा हातात घेऊ देईल.
आणि सर्वांत महत्त्वाचं–
कधी कधी "नाही" म्हणताना तुम्ही एखाद्याला नाराज कराल; पण सतत स्वतःला "हो" म्हणत राहिलात तर कदाचित स्वतःलाच हरवून बसाल.
गरजेच्या वेळी "नाही" म्हणा...
कारण तो नकार दुसऱ्याला नसतो; तो तुमच्या वेळेला, तुमच्या मनाला, तुमच्या स्वप्नांना आणि तुमच्या आयुष्याला दिलेला एक सुंदर "हो" असतो.
एक छोटासा 'नाही' शब्द तुमच्या डोक्यावरचा तणावाचा डोंगर उतरवून टाकेल. स्वतःच्या निर्णयांवर ठाम राहा, स्वतःच्या वेळेचा आदर करा आणि आत्मविश्वासाने जगा. कारण स्वतःला मान देणे आणि योग्य वेळी 'नाही' म्हणणे हाच तुमच्या 'विचार ते विजय' या महाप्रवासातील आत्मसन्मानाचा सर्वात मोठा विजय आहे!

॥ श्री गणेश चिंतन ॥



समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश उत्सवात १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"

कृतज्ञ मी कृतार्थ मी, भगवंत हृदयस्थ आहे 🙏 अपर्णा परांजपे कात्रज पुणे

पुढे.....
तर जन्म-मृत्यूच्या अनुभवामागील देहात्मबुद्धीचा अज्ञानाधार निवृत्त होतो– हा या ओवीचा वेदान्तीय आशय आहे.
६. हे गणेशस्तवनाशी कसे जोडले जाते?
आपण भाग १ मध्ये पाहिले होते–
ॐ नमोजि गणनायेका । सर्व सिद्धिफळदायेका ।
अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा ॥१॥
गणेशासाठी समर्थ म्हणतात –"अज्ञानभ्रांतिछेदका"
आणि सद्गुरूसाठी म्हणतात–"समूळ अज्ञानाचा ठाव पुसून टाकी."
हा शब्दसाम्याचा योगायोग म्हणून सोडून देण्यापेक्षा, संपूर्ण पहिला दशक पाहताना एक तात्त्विक धागा दिसतो:
गणेश → भ्रांतीचा छेद
शारदा → शब्दाच्या अंतरंगाचा उलगडा
सद्गुरू → अज्ञानाचे मूळच निवृत्त
ही मांडणी आपला तात्त्विक समन्वय आहे; समर्थांनी या तीन ओव्यांना जोडून अशी क्रमवारी स्वतः स्पष्टपणे दिलेली नाही. पण त्यांच्या सलग स्तवनांचा आशय असा वाचता येतो.
७. आणि मग सद्गुरूची खरी ओळखपुढील ओवी अत्यंत सुंदर आहे
हरीहर ब्रह्मादिक । नाश पावती सकळिक ।
सर्वदा अविनाश येक । सद्गुरुपद ॥२९॥
इथे "सद्गुरू" हा शब्द केवळ एका व्यक्तीच्या देहापुरता मर्यादित ठेवला तर ओवीचा गूढार्थ सुटतो.
समर्थ म्हणतात–हरी, हर, ब्रह्मादिक– सृष्टीतील उपाधियुक्त रूपे काळाच्या अधीन आहेत; परंतु सद्गुरुपद अविनाशी आहे.
म्हणून येथे "सद्गुरुपद" हा शब्द अत्यंत महत्त्वाचा.
व्यक्ती बदलते.देह बदलतो.उपाधी बदलतात.
पण–सत्याकडे नेणारे, अज्ञानाचा नाश करणारे ते तत्त्व – "सद्गुरुपद".हा अद्वैतार्थ आहे.
८. मग कोणतीही उपमा पुरेशी का पडत नाही?
समर्थ एकामागोमाग एक उपमा देतात– कल्पतरू,चिंतामणी,कामधेनू,लक्ष्मी,स्वर्गसंपत्ती...
पण प्रत्येक उपमा अपुरी ठरते.
सद्गुरुस्तवनाच्या शेवटी समर्थ स्पष्ट करतात की अशा नाशिवंत सृष्टीतील वस्तूंच्या उपमा त्या तत्त्वाला लागू पडत नाहीत. (क्रमशः)



'पिता-पुत्र'

आणि जेव्हा हा वटवृक्ष अचानक कोसळतो, तेव्हा संसाराचे सारे ऊन-पाऊस थेट मुलाच्या अंगावर येऊन आदळतात. त्यावेळी खांद्यावर पडलेल्या जबाबदाऱ्या पेलताना मुलाला पदोपदी जाणीव होते की आपल्यासाठी वडिलांनी आयुष्यभर किती खस्ता खाल्ल्या होत्या! म्हणून हा वटवृक्ष जोपर्यंत आपल्या डोक्यावर उभा आहे, तोपर्यंत त्याच्या सावलीत बसण्याचा कृतज्ञ आनंद प्रत्येकाने घेतला पाहिजे. या वटवृक्षाच्या पारंब्या होऊन आपण जमिनीत घट्ट रुजावे आणि पुढे स्वतः वटवृक्ष होऊन कुटुंबाची धुरा सांभाळावी, हीच खरी पित्याची शिकवण असते.
नात्यांच्या या भरजरी 'महावस्त्रा'चा हा 'पिता-पुत्र' नावाचा पदर अबोल त्यागाचा, कर्तव्याचा आणि नक्षत्रांच्या देण्यासारखा अनमोल आहे. 'न ऋण जन्मदेचे फिटे' या उक्तीप्रमाणे हे पितृऋण कधीही न फिटणारे आहे; पण हे देणं जरी पूर्णपणे कधीच फेडता येत नसलं, तरी ते संस्कारांच्या आणि आठवणींच्या रूपाने कृतज्ञतेने जपणे म्हणजेच या नात्याचा खरा सन्मान!

© *विश्वास देशपांडे, चाळीसगाव.*

ग्रंथालये बंद होणे म्हणजे वाचन संस्कृतीसमोरील मोठे आव्हान

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

तेथे प्रशिक्षित कर्मचारी, वाचकांसाठी चांगले वातावरण, स्वच्छता, प्रकाशव्यवस्था, बसण्याची सुविधा, संगणक, इंटरनेट आणि आधुनिक संदर्भसाहित्य उपलब्ध असणे आवश्यक आहे.

विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील ग्रंथालयांसाठी स्वतंत्र विकास आराखडा तयार करणे गरजेचे आहे. ज्या ग्रंथालयांमध्ये वाचकसंख्या वाढविण्याची क्षमता आहे, अशा ग्रंथालयांना अतिरिक्त प्रोत्साहन दिले पाहिजे.

ग्रंथालयांमध्ये वाचन चळवळ उभी राहावी

ग्रंथालये केवळ पुस्तके घेऊन वाचण्याची ठिकाणे न राहता ती स्थानिक सांस्कृतिक आणि वैचारिक केंद्रे बनली पाहिजेत. पुस्तक प्रदर्शन, लेखकांशी संवाद, काव्यवाचन, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, वाचन स्पर्धा, पुस्तक चर्चा, व्याख्याने आणि विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरे आयोजित करता येतील.

गावातील ज्येष्ठ नागरिकांनी आपला अनुभव तरुणांपर्यंत पोहोचवावा, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नियमित वाचनासाठी प्रोत्साहित करावे आणि पालकांनी मुलांच्या हातात पुस्तक देण्याची सवय लावावी. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ग्रंथालये यांच्यात समन्वय निर्माण झाल्यास वाचन चळवळीला मोठी चालना मिळू शकते.

बंद ग्रंथालये पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न हवेत

ज्या ग्रंथालयांना आर्थिक किंवा व्यवस्थापनाच्या कारणामुळे बंद व्हावे लागले आहे, त्यांचा स्वतंत्र आढावा घेणे आवश्यक आहे. शक्य असलेल्या ग्रंथालयांना स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था, शिक्षण संस्था, उद्योग आणि नागरिकांच्या सहकार्याने पुन्हा सुरू करता येईल.

'एक गावएक ग्रंथालय' किंवा 'प्रत्येक गावात सुसज्ज वाचनालय' ही संकल्पना व्यापक पातळीवर राबविण्याची गरज आहे. समाजातील दानशूर व्यक्ती आणि संस्थांनी वाढदिवस, स्मृतिदिन किंवा इतर कार्यक्रमांवर अनावश्यक खर्च करण्याऐवजी ग्रंथालयांना पुस्तके आणि आवश्यक साहित्य देण्याची संस्कृती निर्माण केली तर त्याचा मोठा फायदा होऊ शकतो.

वाचकांनीही आपली जबाबदारी ओळखावी

ग्रंथालये टिकवण्याची जबाबदारी केवळ शासनाची नाही. वाचकांचीही तितकीच जबाबदारी आहे. ग्रंथालयात जाऊन पुस्तके वाचणे, पुस्तकांची काळजी घेणे, नवीन पुस्तकांची मागणी करणे आणि इतरांना वाचनासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. प्रत्येक कुटुंबाने महिन्यात किमान एक पुस्तक वाचण्याचा संकल्प केला, प्रत्येक शाळेने नियमित वाचन तास घेतला आणि प्रत्येक गावाने आपल्या ग्रंथालयाला सक्रिय केले तर वाचन संस्कृतीला नवसंजीवनी मिळू शकते.

वाचन संस्कृती जपणे ही सामूहिक जबाबदारी

महाराष्ट्रात ९९३ सार्वजनिक ग्रंथालये बंद होणे ही भविष्यासाठी धोक्याची घंटा समजली पाहिजे. मात्र या परिस्थितीकडे केवळ निराशेने पाहण्याची गरज नाही. योग्य नियोजन, पुरेसा निधी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि समाजाचा सक्रिय सहभाग यांच्या माध्यमातून ग्रंथालय चळवळीला पुन्हा बळकटी देता येऊ शकते.

ग्रंथालये ही समाजाची वैचारिक मंदिरे आहेत. त्यांच्या दारावर कुलूप लागणे म्हणजे केवळ एका इमारतीचे दार बंद होणे नव्हे, तर ज्ञानाकडे जाणारा एक मार्ग बंद होणे आहे. त्यामुळे बंद पडणारी ग्रंथालये वाचवणे आणि नव्या पिढीला पुस्तकांशी जोडणे ही आजची अत्यंत महत्त्वाची सामाजिक गरज आहे.

मोबाईलच्या पडद्यापलीकडेही एक मोठे जग आहे आणि ते जग पुस्तकांच्या पानांमध्ये दडलेले आहे. त्या पानांशी नव्या पिढीची मैत्री झाली तरच महाराष्ट्राची समृद्ध वाचन परंपरा पुढे चालू राहील. ग्रंथालये वाचली तर वाचन संस्कृती वाचेल; वाचन संस्कृती वाचली तर समाजाची वैचारिक समृद्धी आणि लोकशाहीची जाणीव अधिक मजबूत होईल.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर निर्माण होणाऱ्या व्यवसायाच्या संधीचे सोन करा - बाळकृष्णजी भारतीया



ज्योतिर्मय साहित्य

वैजापुर - येणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर निर्माण होणाऱ्या व्यवसायाच्या संधीचे सोन करण्यासाठी स्थानिक व्यापारांनी सज्ज व्हावे. स्वदेशी वस्तूंचा आणि स्थानिक निर्माते, व्यवसायीकांच्या मालाला प्राधान्यक्रम देउन स्थानिक बाजारपेठ आर्थिक दृष्ट्या सक्षम करावी, असे प्रतिपादन मा. बाळकृष्णजी भारतीया - राष्ट्रिय अध्यक्ष, स्वदेशी व्यापारी मंच तथा राष्ट्रिय अध्यक्ष कॅट यांनी वैजापुर येथिल व्यापायांच्या मार्गदर्शन बैठकीच्या वेळी केले.

वैजापुर येथील डॉ. हेडगेवार ना. स. पत संस्थेत आयोजीत व्यापाऱ्यांच्या बैठकित कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. बाळकृष्णाजी भारतिया, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा. सचिनजी निवगुणे, मराठवाडा उपाध्यक्ष भी कचरू वेळजकर, जिल्हा अध्यक्ष श्री विजय जैसवाल, जिल्हा उपाध्यक्ष श्री अनंत बोरकर तथा आरती बादल आदी मान्यवर हजर होते. या प्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष पुढे म्हणाले कि, मल्टी नॅशनल कंपन्यांनी कुंभ मेळ्यासाठी संपूर्ण तयारी वेळेत केली आहे स्थानीक व्यापा-यांनी व स्वतःच्या व्यवसाय फायद्यासाठी, संपूर्ण ताकतीनिशी या येणाऱ्या संधीचे सोने करावे. प्रदेश अध्यक्ष श्री सचिनजी निवेगुणे यांनी यावेळी व्यापान्यांना एकजुट होण्याचा सल्ला दिला. ''अभ्यासुनी प्रकटावे'' या रामदास स्वामींच्या ओवी प्रमाणे व्यापाऱ्यांनी कायद्याचा अभ्यास करावा. कायद्यान्चे पालन करावे, आणि निर्धास्तपणे आपला व्यवसाय करावा. विना कारण प्रशासकिय अधिकाऱ्यांची भीती मनात बाळगू नये, तस झाल्यास संपूर्ण देशातील कॅट संघटना तुमच्या पाठीशी उभे राहील असे अस्वासन देखिल निवगुणे यांनी दिले.

या प्रसंगी कन्चरू वेळंजकर, विजय जैसवाल, अनंत बोरकर यांची समायोजित भाषणे झाली. प्रास्तावीक प्रशांत कंगले यांनी केले तर, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन दामोदर पारिक यांनी केले. याप्रसंगी आलेल्या पाहुण्यांचा सत्कार किराणा व्यापारी संघटनेचे अध्यक्ष श्री प्रकाश बोथरा, गौरख पालेजा, निलेश पारख, भिमाशंकर साखरे आणि शांतिलाल संचेती यांनी केले .

या बैठकित स्वदेशी व्यापारी मंच आणि कॅट चे राष्ट्रिय अध्यक्ष मा.श्री. बाळकृष्णजी भारतिया - महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष , स्वदेशी व्यापारी मंच आणि कॅट अध्यक्ष श्री निवगुणे यांनी दामोदर पारिक यांची तालुका संयोजक या पदावर नियुक्ती जाहीर केली.

अभिजात मराठी भाषा अभिरूप दर्जा सप्ताह कवितेची कार्यशाळा

ज्योतिर्मय साहित्य

पुणे - हुजूरपागा गर्ल्स इंग्लिश मिडियम स्कूल,कात्रज- मांगडेवाडी, पुणे येथे कवितेची कार्यशाळा संपन्न झाली. कविता म्हणजे भावनांचा खेळ, मनातील विचारांचा ताळमेळ कवितेच्या कार्यशाळेचे बहुमोल मार्गदर्शन वसुधा वैभव नाईक यांनी केले. वसुधा नाईक यांचे वसुधा फाउंडेशन आहे.त्या स्वतः संस्थापिका,अध्यक्ष असून त्या एक निवृत्त उपक्रमशील शिक्षिका म्हणून प्रसिद्ध आहेत. त्याचबरोबर कवयित्री, लेखिका आणि समाजसेविका आहेत. गेली वीस वर्षांपासून त्यांचे हे कार्य अविरत चालू आहे. वसुधा फाउंडेशन आणि त्यांची टीम गौरव,योगेश, मयुरी, सायली हे सर्व उत्तम साथ त्यांना देतात एकमेकांच्या सहकार्याने कोणतेही कार्य उत्तम होते. कवितेच्या कार्यशाळेमध्ये कवितांच्या विविध प्रकारांवर भर देण्यात आला. आठवी, नववीच्या पाठ्यपुस्तकातील कवितांच्या आधारे विविध प्रकार समजावून दिले गेले. कवितांचे गायन केले गेले. गुरुने दिला ज्ञानरूपी वसा, भेटी लागे जीवा, भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी अशा अजरामर गीतांसहित अतिशय उत्तम उदाहरणे देऊन मुलींना कविता कशी करायची, यमक शब्दांचे महत्व आणि कवितेचे विविध प्रकार समजावून सांगितले गेले.

मुलींना स्वतः मधीलच चार गुण लिहिण्यास सांगून वसुधा मॅडमने पण स्वतःतील चार गुण लिहिले व त्या गुणांवर आधारित कविता सादर केली.

याचाच आधार घेऊन जवळ जवळ वीस मुलींनी चारोळी,आठोळी अशा कविता तयार केल्या यालाच आपण शीघ्र कवी म्हणतो. आणि या तीनशे मुलींमधून ऑन द स्पॉट आम्हाला वीस मुली कविता करणाऱ्या मिळाल्या. अजून बऱ्याच जणी तयार होणार हे निश्चित.



या कवितेच्या कार्यशाळेच्या माध्यमातून असे समजून आले की मुलांना मार्गदर्शनाची गरज आहे. मार्गदर्शन व्यवस्थित झाले तर उत्तम कवी निश्चितच घडू शकतात. कवितेची कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी मा. मुख्याध्यापिका कीर्ती पंडित मॅडम,हुजूरपाच्या शाळेचे सर्व शिक्षक, मावशी, काका आणि विद्यार्थिनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

शेवटी एकच सांगते.. शब्दांची ओंजळ आणि भावनांची साथ कवितेने धरून्या सृजनाची वाट लेखणीच्या स्पर्शातून उमलू दे कविता मनामनांत जागवूया साहित्याची पहाट.....

आयुष्य एक रंगमंच

सौ. प्रज्ञा शिंदे
सातारा
मो. नं - ९५६१७८९६४५

ज्योतिर्मय साहित्य

परमेश्वराने आपण जन्माला येण्या आधीच आपला रोल निश्चिचीत केलेला असतो. जन्म आणि मृत्यू यामधील अंतर म्हणजेच आयुष्य... जणू हा एक रंगमंच च आहे.. या रंगमांच्यावर आपल्या जन्माने आपली एन्ट्री होते... तेंव्हा... टाहो फोडून आपण रडत जन्माला येतो. म्हणजे आपल्या रडण्याच्या आवाजाने इतरांच्या चेहऱ्यावर आनंद असतो. आपल्या आईच्या डोळ्यातून आनंदाश्रू. येतात. म्हणजे आपल्या घरातील लोक, स्नेहजन, नातेवाईक.. हसत मुखाने आपले स्वागत करतात..

इथूनच आपली भूमिका सुरु होते. कुणाचा मुलगा, मुलगी, नातं, नातू, बहीण, भाऊ, अशा अनेक नात्यांच्या वेगवेगळ्या भूमिका साकारणे म्हणजे जणू एकांकिका च सादर करावी लागते.

हा रंगमंच. तसा अनोखा आहे. आपणच आपला रोल परफेक्ट निभवायचा आहे.. सुख दुःख,भाव भावना, संकट, चढ, उतार... यांचा अभ्यास करून...प्रत्येक भूमिका... पार पाडायची असते.

हा नात्यातील भूमिकांचा अभिनय जशी स्क्रिप्ट तसा सादर करायला लागतो... पण



हा मनुष्य.. जन्म सृष्टीच्या निर्मात्यानं आपल्याला का दिला आहे..? यातील आपली भूमिका काय आहे..? हे जाणून घेण्यासाठी अंतर्मुख व्हावे लागेल... मी परमेश्वराच्या नजरेत परफेक्ट असणं गरजेचं आहे. स्वतः च्या नजरेत परफेक्ट असणं गरजेचं आहे. तरच ह्या मनुष्य जन्माची भूमिका ... कर्म रूपात असलेली स्क्रिप्ट वाचून ती यशस्वी करता येईल...यासाठी सतत प्रयत्न करत रहावे...संत तुकाराम आपल्याला त्यांच्या अभंगातून छान उपदेश करतात.. जे का रंजले.. गांजले त्यासी म्हणे जो आपुले.. देव तेथेची जाणावा.. जे भुकेलेले, गरीब, कष्टी, चिंतेने, आजाराणे त्रासलेले आहेत.. अशा लोकांना मानसिक आधार दयावा.आपल्या कर्मातून मानवता धर्म जपत रहावा,मनुष्य जन्माची सार्थकता.. निखळ मनात आहे, सद्विचारात आहे, दुसऱ्याचं भलं करण्यात आहे, संस्कार, संस्कृती जपण्यात आहे.नम्रता, सदाचार अंगीकरण्यात आहे. असच हे कर्म करत मोक्षाकडे वाटचाल करण्यात आहे.म्हणजेच...

परमात्म्याचे स्मरण सदैव करावे
मनुष्य जन्माचे मर्म समजावे
कर्म आपुले ऐसे असावे
एक हृदय घेऊन यावे
जाताना अनेक हृदयात रहावे...!

साक्षात परमेश्वराने सुद्धा आपली भूमिका चांगली झाली म्हणून स्वर्गात वाट पहावी.. मनुष्य जन्माची ही भूमिका... पडता पार... टाळ्यांचा व्हावा गजर अपार .....!

***

महात्मा फुले साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. प्रल्हाद लुलेकर

ज्योतिर्मय साहित्य


छत्रपती संभाजीनगर - मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व ज्ञान प्रसारक मंडळ, येरमाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महात्मा फुले साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध विचारवंत, लेखक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी मराठी विभागप्रमुख डॉ. प्रल्हाद लुलेकर यांची निवड करण्यात आली आहे.

राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले द्विशताब्दी जन्मोत्सवी वर्ष, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरूजी जन्मशताब्दी आणि ज्ञान प्रसारक मंडळ, येरमाळा संस्थेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त सदर संमेलनाचे आयोजन दि. १६ व १७ ऑक्टोबर २६ रोजी करण्यात आले आहे. हे साहित्य संमेलन रा. रं. बोराडे साहित्यनगरी शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब जि. धाराशिव येथे पार पडणार आहे. दोन दिवसांत भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाच्या उदघाटक सुप्रसिद्ध लेखिका डॉ. वृक्षाली किन्हाळकर असून, संमेलनास प्रमुख



पाहुणे म्हणून आमदार राणा जगजितसिंह पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे उपस्थित राहणार आहेत.

आले ढग...गेले ढग (कवितासंग्रह), बलुतेदार, गावगाड्याचे शिल्पकार, बलुतेदारांची हत्यारे आणि अवजारे, मोगडा, अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा : दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बहुजन संस्कृतीचे जनक : महात्मा जोतीराव फ ुले, महात्मा जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वेध आणि वेधक, प्रतिभेचे प्रदेश, पंचधारांचा प्रदेश, साहित्याचे सांस्कृतिक संचित, साहित्याचे वर्तन आणि वर्तमान, भंजनाचे भजन, साठोत्तरी साहित्य प्रवाह- भाग १, साठोत्तरी साहित्य प्रवाह- भाग २, भूमिकांचा ऐवज, मराठवाड्यातील मराठी वाड्.मयाचा इतिहास, मराठी व्याकरण आणि लेखन, अनिवार्य मराठी : व्याकरण, लेखन आणि आकलन, मराठवाड्याचे साहित्य, जातक (दत्ता भगत गौरवग्रंथ), निवडक उत्तम कांबळे, दुःखाविषयी निबंध- मुक्ता साळवे, आस्वाद आणि समीक्षा (प्रा. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या निवडक प्रस्तावना), सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक, शेतकऱ्याचा आसूड, समग्र वाड्.मय : सावित्रीबाई फुले ही त्यांची ग्रंथसंपदा आहे. त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितमित्र पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ट वाड्.मय निर्मितीचे दोन पुरस्कार. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेचा साहित्य पुरस्कार, अन्य संस्थांचे साहित्य पुरस्कार आदी पुरस्कार मिळाले आहेत. १४ वे विद्रोही साहित्य संमेलन, (हिंगोली २०१९), प्रादेशिक साहित्य संमेलनांचे ते अनेक वेळा अध्यक्ष राहिले आहेत.




न लिहिलेले पत्र- भाग २: पुन्हा एकदा पत्र लिहूया

ज्योतिर्मय साहित्य

याचा अनुभव घ्यायचा असेल तर एखादे जुने पत्र, परदेशात राहणाऱ्या नातेवाईकाचे किंवा आपल्याला सोडून गेलेल्या व्यक्तीचे शोधून काढा. त्याकडे क्षणभर पाहा आणि मग वाचा. म्हणजे तुम्हाला मी काय म्हणतो याची अनुभूती येईल.

त्याचे एक कारण असेही आहे की, मानसशास्त्रीय दृष्टीने त्या पत्राचा रंग, आकार, गंध, त्यावरील शब्दांचे दृश्य स्वरूप आणि त्यांचा अर्थ हे आपल्या मेंदूतील स्मृतींना उद्दीपित करतात. त्या पत्राच्या अनुषंगाने अनेक गोष्टी आपल्या स्मृतीत पुन्हा जाग्या होतात; जणू एखादी महत्त्वाची संचयिका आपण बाह्य संगणक-संचयिकेतून आपल्या संगणकावर पुन्हा उघडतो.

असा अनुभव घेण्यासाठी एक अडचण भविष्यात येऊ शकते आणि आतापासून पन्नास वर्षांनंतर तर नक्कीच येईल, कारण आपण हल्ली पत्र लिहितच नाही. आपण विद्युत संदेश म्हणजे ई-मेल, व्हाटस् अपवर संदेश लिहितो. पूर्वी पोस्टकार्ड, आंतरदेशीय पत्र किंवा कागदावर हाताने लिहून पाकिटातून पाठविण्याची पद्धत होती. आता टपाल कार्यालयात पोस्टकार्ड,



आंतरदेशीय पत्र, पाकीट मिळतही असेल कदाचित; पण त्याचा कोणी उपयोग मात्र करीत नाही.

पूर्वी मनीऑर्डरच्या फॉर्मवर चार-पाच ओळी लिहिता येत असत. आता काय, फोन पे, गुगल पे, आयएमपीएस, आरटीजीएस याद्वारे पैसे पाठविण्याचा काळ सुरू झाला आहे. पूर्वी पगार मिळाल्यावर चलनी नोटांचा हाताला होणारा सुखावह स्पर्श होता. आता तोही हरवून गेला आहे. सगळीकडे केवळ आभासी माध्यमातून पैशांची देवाणघेवाण होत आहे. पैसे दिसतही नाहीत, ऐकूही येत नाहीत, खुर्दा तर दूरच राहिला!

आता बोललेले ध्वनिमुद्रित करून आवाज साठवून ठेवता येतो. व्हिडिओचित्रण करून शरीराच्या हालचाली आवाजासह जतन करता येतात. तरीही हस्ताक्षरातील मजकूर हा एक वेगळाच आनंद देतो. मी तर म्हणतो, एक प्रयोग म्हणून हा लेख वाचल्यानंतर हवे तर तुम्ही मला 'दादा' म्हणून पत्र लिहा किंवा अगदी स्वतःलाच पत्र लिहा आणि बरोबर एक वर्षानंतर, म्हणजे शनिवारी, ९ ऑक्टोबर २०२७ रोजी, ते पत्र काढून वाचा आणि बघा कसा अनुभव येतो ते.



न लिहिलेल्या पत्रापेक्षा कसेही आणि कितीही साधेपणाने लिहिलेले पत्र कालांतराने किती महत्त्वाचे आणि आनंददायक ठरू शकते, याचा अनुभव एकदा घेऊनच बघा. मी सांगतो म्हणून नव्हे, तर स्वतःच्या अनुभवासाठी.

नका दडपून ठेवू तुमच्या भावना. पत्र लिहिणे हा खरे तर मानसशास्त्रीय दृष्ट्या ताणतणाव हलका करण्याचा एक मार्ग आहे. त्याला इंग्रजीत क्याथेरेसीस म्हणतात. तुम्हाला हवे तर तुम्ही तुमचे मन मला पत्र लिहून मोकळे करू शकता. तुमचे वय अगदी वीस वर्षांपासून सत्तर वर्षांपर्यंत असो; विषय कुठलाही असू द्या. मी तुम्हाला अभिवचन देतो की, तुमच्या पत्राचे उत्तर मी पत्र लिहूनच देईन. मी वाट पाहतो तुमच्या पत्राची. मला कल्पना अआहे कि, तुम्ही म्हणाल पत्ता कुठे. तुम्ही मला पत्र लिहून पाठविणार असाल तर आधी तसा विद्युत संदेश खाली दिलेल्या विद्युत संदेश संकेत सूत्रावर अर्थात इमेलवर पाठवा म्हणजे मी तुम्हाला माझा घरचा पत्ता पाठवेन.

तुम्ही आता जरी पत्र लिहिले, तरीही मी ते तुमचे पत्र काळजीपूर्वक जपून ठेवीन. हां, पण लक्षात ठेवा, पत्र हाताने लिहावयाचे आहे. आंतरदेशीय पत्र, पोस्टकार्ड किंवा अगदी साध्या कागदावर लिहून लिफाफ्यातदेखील पाठवू शकता. ठरेल तर मग आता. पाहू, किती जण हा प्रयोग करून बघतात ते!

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559